# राशिभविष्य - जानेवारी, २०१४.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

=============================================

## सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा !

=============================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे जरूरीचे होणार आहे. शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, फोड येणे, इजा होणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे असे आजार होणे संभवते. जपा. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. कारण वाईट मार्गाने प्रसिद्धी मिळणेही संभवते. जपा. स्वत:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. तसेच असह्य मनस्ताप होणेही संभवते. या राशीच्या लेखकांना काळ अनुकुल असल्यामुळे त्यांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. तसेच शुक्र ग्रहाच्या अनुकूलतेमुळे काहींना धनलाभ, काहीना भूमिलाभ तर काही मंडळीना प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यताही जाणवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकूल व लाभदायक होईल. पूर्वार्धात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. पण बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या हर्षलमुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे शक्य आहे. जपा. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात लहरी स्वभावामुळे घरीदारी सतत मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. मानसिक ताण, विरोध, भांडणे, आजार, मतभेद, मानहानी अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. पण चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, अध्यात्म, वकिली-सल्लागारी व्यवसाय, मानसोपचार तज्ञ, द्रव पदार्थांचे व्यापारी अशांना काळ अनुकूल वा लाभदायक होईल. ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांनाही अशा संबंधामुळे अधिक लाभ होणे संभवते. दिनांक ६ पासून शुक्र ग्रह अनुकुल होत असल्याने या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ, काहीना धनलाभ तर काहीना प्रतिष्ठा किंवा मानसन्मान प्राप्त होण्याची शक्यता दिसते. संततीसुखाचे दृष्टीने या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ प्रतिकूल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा.

धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. आरोग्य उत्तम राखता आले तरच या राशीचे विद्यार्थी शैक्षणीक प्रगती करू शकतील. श्रीगणेश उपासना अनुकूल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना महिन्याच्या काळात अपेक्षित गृहसौख्य व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेलच याची खात्री दिसत नाही. जीवनसाथीचे व स्वत:चे अनारोग्य, दोघातील वाद, भांडणे यांमुळे नैराश्य येणे संभवते. काही मंडळीना पोटविकार, अपचन, मूत्राशयविकार अशापैकी आजार होणे संभवते. घरगुती भांडणे, राहत्या जागेबाबतचे किंवा स्थावरबाबतचे वाद यांमुळे अपेक्षित गृहसौख्य लाभणे अशक्य होईल. संततीसुखाचे दृष्टीनेही या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे सहज शक्य होईल. त्यामुळे मन स्वस्थ व शांत होईल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील, तर काहीना परदेशप्रवासाचे योग येतील. कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना, चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय, शिक्षणक्षेत्र असे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण या राशीच्या विद्यार्थ्यांना मात्र अन्य गोष्टींच्या मोहात मन व बुद्धी अडकल्यामुळे शैक्षणिक प्रगती साधणे अशक्य होईल. जपा. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्र वाचा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक असणार आहे. म्हणून त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. उराशी बाळगलेली महत्वाकांक्षा सफल होण्यास काळ अनुकुल आहे. शासकीय, निमशासकीय नोकरदार मंडळींना, कला क्षेत्रातील मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकूल होईल. पण वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणाराना, शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणाराना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण छोट्या मोठ्या अपघातापासून जपावे. पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांना पाण्यापासून धोका संभवतो. जपा. तसेच विषभयही संभवते. कौटुंबिक वाद, स्थावरसंबंधी वाद अशापैकी कारणांनी गृहसौख्य मिळणे कठीण होईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनात वाद, भांडणे यामुळे सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. जपा. या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरीच करावी. नवे काही करण्याचा विचारही करू नये.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल.

शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. पण मुलांपैकी कोणाच्या आजारपणामुळे संततिसुखात थोडी बाधा येण्याची शक्यता दिसते. तसेच जवळच्या नात्यातील कोणाशी दुरावा निर्माण झाल्यामुळे मन अस्वस्थ होईल. अनपेक्षित खर्च, आर्थिक जबाबदाऱ्या, येणे वसूल न होणे अशा- पैकी कारणानी चिंता निर्माण होईल. जपा. त्यामुळेच शारीरिक उष्णता भडकून घसा, दाढा, मान, डोळे यापैकी कसले तरी दुखणे सहन करावे लागेल. जपा. स्वत:चे किंवा जीवनसाथीचे आजारपण किंवा अन्य कारणाने वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. सतत सावधानतेने आचरण करा. वाहन सुरक्षित वेगाने चालवा. अपघातभय आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात विरोधक नमतील, शत्रू पराभूत होतील, धनलाभ होईल व सुखशांती लाभेल. काहीना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या विवाहेच्छ युवकयुवतीना विवाहयोग संभवतो. काहीना नवे मित्र मिळतील तर या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल.  श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना अजून एक वर्ष शनि ग्रहाच्या साडेसातीला तोंड द्यावे लागणार आहे. पण यापूर्वीची साडेसहा वर्षे असह्य मनस्तापाची गेली असतील तर यापुढील उर्वरित काळ फारसा मनस्ताप सहन करावा लागणार नाही. उलट काही मनोनुकुल घटनाच घडतील. पण त्यासाठी आपल्या संतापी स्वभावावर नियंत्रण ठेवावे लागेल. अकारण जिद्द करून दगदग न करता सहनशील बनून मनस्थिती शांत, प्रसन्न राखता आली पाहिजे. नपेक्षा अनारोग्य सहन करावे लागेल. धनस्थानी शनी-राहू असल्याने स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, प्रिय जनांचे स्थलांतर, नियोजित कार्यात अडथळे येणे, आर्थिक  समस्या अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात  बाधा येणे शक्य दिसते.  अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या मंडळीना धन, मान, प्रतिष्ठा, भूमी अशापैकी लाभ होण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत वरिष्ठाचा त्रास, मुलांपैकी कोणाचे आजारपण, प्रिय जनांचा दुरावा अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते.  तसेच जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघातील मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखातही बाधा येऊ शकेल. त्यामुळे अनारोग्य सहन करावे लागेल. जपा.  गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने बौद्धिक, शैक्षणिक, संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे सहज शक्य होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना  या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. मात्र स्वत:चे व जीवनसाथीचे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखले गेले पाहिजे. कारण वातविकाराचा त्रास होणे संभवते. शिवाय मनस्ताप देणाऱ्या घटनांनी नैराश्य येणे संभवते. एवढे

संभाळलेत तर रवि-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व नोकरी-व्यवसायात ज्या लाभदायक घटना घडतील त्यांचा आनंदही मिळेल. सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील झाले असण्याची  शक्यता आहे. तसे झाले असेल  तर अध्यात्मात मन रमवा. कारण अध्यात्मात रस असेल तर गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे आध्यात्मिक उन्नतीसाठी काळ अतिशय अनुकुल आहे. त्यामुळे मन:शक्ती वाढेल व महिन्याच्या उत्तरार्धात घडू शकणाऱ्या कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील कटकटीना सामोरे जाणे सहज शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे सहज शक्य होईल. पण हा हर्षल अति विचारामुळे डोकेदुखीचा किंवा मेंदुविकाराचा त्रासही निर्माण करू शकेल. जपा. शत्रु ग्रहाच्या राशीतील व्यय स्थानी असलेला मंगळ सतत मनस्तापच देईल. जपा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीचा सध्या शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालू  आहे याची सतत जाणीव ठेवून, सहनशील बनून व मनावर ताबा ठेवूनच  कालक्रमणा करावी, हे उत्तम. नपेक्षा अधिकच मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या, आर्थिक फसवणूक अशा समस्या  त्रस्त करतील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळ्याचे अनारोग्य सहन करावे लागेल. जपा. एवढे टाळता आले व घरगुती परिस्थितीत गैरसमज टाळता आले तर शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान व गृहसौख्य  लाभेल. या राशीच्या कलाकार मंडळीना, कलात्मक लेखकाना या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या ज्या मंडळीच्या जन्मकुंडलीत  अचानक धनलाभ योग असेल अशापैकी काहीना वारसा हक्काने धनलाभ वा अचानक धनलाभ मिळू शकेल. काहीना मौल्यवान वस्तू मिळू शकतील. पण असे अपवाद वगळता सर्वसाधारणपणे या राशीच्या मंडळीना कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थ प्राप्ती करून घ्यावी लागेल. मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. व्यय स्थानी असलेला राहू शत्रूपासून रक्षण करील;  तर शनि मनस्ताप देणाऱ्या घटना घडवील. जपा.  श्रद्धा असेल तर श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** एकंदरीत विचार करता या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागते. केवळ गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. नियोजित कार्यात अडथळे निर्माण होणे, आप्तेष्ट भांडणे होणे, फसवणूक होणे वित्त हानी होणे, असह्य मनस्ताप सहन करावा लागणे अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. रक्तदाब

हृदयविकार असे आजार असणारांनी प्रयत्नपूर्वक मन शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आर्थिक चिंता त्रस्त करतील. नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल व वरिष्ठांशी भांडणे होणे संभवते. व्यापार-व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. काही मंडळीना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. अशा परिस्थितीत मन व बुद्धी शांत व स्थिर ठेवून, मनावर संयम ठेवून आणि सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करूनच विपरीत काळ घालवला पाहिजे. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची अन्य समस्या यांकडे लक्ष द्यावे लागेल. गुरु-शुक्र हे शुभ ग्रह काही प्रमाणात अनुकूल असल्याने मधून मधून कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. विवाहेछूचे विवाह ठरतील. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध जुळतील. काहीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या २-३ आणि २७-२८ तारखांच्या दिवशी विशेष जपावे. अविस्मरणीय अशा अनुकुल/प्रतिकूल घटना घडू शकतील असे दिसते. रवी-बुध पूर्णपणे प्रतिकूल असल्याने सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. त्यामुळे गहरे नैराश्य येणे शक्य दिसते. हाती घेतलेल्या कार्यात अडथळे येतील. त्यामुळे काही जण गलितगात्र होणेही शक्य आहे. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्ती शांत राखण्याचा प्रयत्न करावा. संयम राखून व सहनशील बनून आचरण करावे, हे उत्तम. अशाही परिस्थितीत ज्यांचे चिकित्सक उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र आहे अशांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होण्याची शक्यता आहे. तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय, कोळसा व लोखंडी सामानाचे व्यापारी यांनाही काळ अनुकुल व लाभदायक होईल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना मात्र काळ प्रतिकूल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या काहींना परदेशगमनाचे योग संभवतात तर काहींना अंतर्गत प्रवासाचे योग येतील. पण असा प्रवास शक्यतो टाळा. कारण प्रवासात त्रास होणे संभवते. महिन्याच्या पहिल्या साप्ताहानंतर शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय कोमल झाले असण्याची व त्यामुळे शीघ्र मानसिक संवेदना होत असण्याची शक्यता वाटते. असे असेल तर मनाविरुद्ध काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे असे वाटते. अस्वस्थ मनस्थितीत जिभेल लगाम घालूनच आचरण करा. नपेक्षा अकारण इतरांचे अपमान होतील. जपा. अविचाराने खर्च होणे संभवते. जपा.

अशा परिस्थितीत  अध्यात्माकडे मन वळवून थोडी उपासना केलीत तर मन व विचारशक्ती शांत व स्थिर राहील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शत्रू ग्रहाच्या राशीतील मंगळ ग्रहामुळे उष्णता विकारांनी अनारोग्य होणे संभवते. जपा. तसेच अपघात भय असल्यामुळे सावधानतेने हिंडा फिरा  व वाहने चालवा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल वा लाभदायक होईल. यांत्रिकतांत्रिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र महिन्याचा उत्तरार्धच  प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण कौटुंबिक सुख व गृहसौख्य यात थोडी बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. श्रद्धेने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर व लहरी असा झाला असावा, असे वाटते. कोणी केलेला उपदेश सहन होत नसावा, असे वाटते. आर्थिक चिंता, मानसिक व्यग्रता यामुळे असे होत असावे, असे वाटते. असे असेल तर या राशीच्या लहान मुलांच्या पालकांनी मुलांकडे विशेष लक्ष देणे जरूरीचे होईल. या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल, स्थावर संबंधी खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील. पण नातेसंबंधातीलच कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा मतभेदांमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे शक्य आहे. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी तर गैरसमजाने वा संशयाने भागीदारी तुटणार नाही, याची काळजी घ्यावी. ज्यांना वाम मार्ग धन सहज मिळणे शक्य आहे त्यांनी सुद्धा असा मोह टाळावा हे उत्तम. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे गंभीर स्वरूपाचे अनारोग्य होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. तसेच कुलदेवतेची उपासनाही मन:शांती देऊ शकेल.

=====ooooo=====